# मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय

क्र. संकीर्ण २०२४/प्र.क्र.५/निवडणूक-७/३३
सामान्य प्रशासन विभाग, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय,
मुंबई – ४०००३२.
दि. २० सप्टेंबर, २०२४

प्रति,

विभागीय आयुक्त, (सर्व)

**विषय :** आगामी विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ च्या अनुषंगाने जिल्हास्तरावरील सर्व अधिकारी / कर्मचारी यांच्या प्रशिक्षणाबाबत.

**संदर्भ :** या कार्यालयाचे संकीर्ण २०२४/प्र.क्र. ५/निवडणूक ७/ ३३ दि. १२ सप्टेंबर २०२४ रोजीचे पत्र.

महोदय / महोदया,

राज्यामध्ये आगामी विधानसभा सार्वत्रिक निवडणूका ऑक्टोंबर, २०२४ मध्ये घोषित होण्याची शक्यता आहे. या निवडणूकीच्या तयारीचा भाग म्हणून राज्यातील निवडणूकांशी संबंधित सर्व अधिकारी व कर्मचारी यांना निवडणूक विषयक प्रक्रियेचे प्रशिक्षण देण्याकरीता जिल्हास्तरावरील प्रशिक्षणाबाबतचे तात्पुरते वेळापत्रक या कार्यालयाच्या दि. १२.०९.२०२४ रोजीच्या पत्रान्वये सर्व जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी यांना पाठविण्यात आलेले आहे. (प्रत सोबत)

तथापि, DLMTs, ALMTs व नोडल ऑफिसर यांच्या प्रशिक्षणासाठी, काही जिल्हयांमध्ये पुरेसे SLMTs उपलब्ध नाहीत. अशा जिल्हयांना इतर जिल्हयांमधील SLMT प्रशिक्षणासाठी उपलब्ध करुन घ्यावे लागणार आहेत.

यास्तव, आपल्या विभागातील ज्या जिल्हयांना प्रशिक्षणासाठी इतर जिल्हयाकडून SLMTs यांच्या सेवेची आवश्यकता असेल, त्या जिल्हयांना त्यांच्या मागणीनुसार SLMTs ची सेवा इतर जिल्ह्यातून / विभागातून उपलब्ध करुन देण्याबाबत आपल्या स्तरावरुन समन्वय करण्यात यावा, ही विनंती. (SLMTs ची यादी सोबत जोडत आहे.)

तसेच निवडणूकीशी संबंधित सर्व जिल्ह्यांचे प्रशिक्षण विहीत वेळेत पूर्ण होण्यासाठी आपल्या स्तरावरुन आवश्यक कार्यवाही करण्याची विनंती आहे.

आपला,
20-09-24
(विवेक जगदाळे)
कक्ष अधिकारी, मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय,
महाराष्ट्र राज्य

प्रत,

१. उपआयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, (सर्व).
२. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी, (सर्व).
३. उपजिल्हाधिकारी तथा उपजिल्हा निवडणूक अधिकारी, (सर्व)